**महाराष्ट्र शासन**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र२२७९३६९०-०२२ . email:- desk-est1.agri@mah.gov.in

क्रमांक :- कृपवि-३५२४/प्र.क्र.३०१/प्रशा-१ दिनांक:- २९ ऑगस्ट, २०२४

प्रति,

संचालक
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**विषय:-शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याबाबत.**

महोदय/ महोदया,

या विभागात विवक्षित सेवा/ कामांसाठी शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याच्या अनुषंगाने शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात सोबत जोडली आहे. तरी सदर जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

**( वर्षा मं.मेहेर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
निवड नस्ती

महाराष्ट्र शासन
कृषि व पदुम विभाग,
५वा मजला, दालन क्र.५२२ (विस्तार),
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदींनुसार ३ सेवानिवृत्त लघुलेखकांच्या सेवा करार पध्दतीने विषयनिहाय एमपॅनलमेंट करुन घ्यावयाच्या आहेत.

विवक्षित सेवा/ कामाचे स्वरुप, अर्हता, अनुभव व वय याचा तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

| अ.क्र. | विवक्षित सेवा/ कामाचे स्वरुप | अर्हता, अनुभव व वय |
|---|---|---|
| १. | श्रुतलेखनाचे/ लघुलेखनाचे काम | श्रुतलेखन/ लघुलेखन कामकाजाचे ज्ञान आवश्यक<br>कामाचा ३ वर्षांचा अनुभव असावा.<br>वयोमर्यादा ५९ ते ६४ वर्षांपर्यंत |

नियुक्तीच्या अटी व शर्ती :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येतील. तसेच दि.८.९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार आर्थिक लाभ देण्यात येतील.

इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह दि.१०.९.२०२४ पर्यंत सादर करावेत. जाहिरातीमधील पदांची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

अवर सचिव
कृषि व पदुम विभाग
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३६९०